वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि.११ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# ‘वंदे मातरम’चा ‘इव्हेंट’ भाजपच्या अंगलट

## पैशाच्या जोरावर घोटाळे करून निवडून येणाऱ्या सरकारचे पंतप्रधान हीच मोदींची जागतिक ओळख



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com
दिव्य वार्ता

दिल्ली, (वृत्तसेवा):- वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संसदेत सोमवारपासून चर्चा सुरू आहे. या चर्चे दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेस आणि पंडित नेहरूंनी वंदे मातरमचे तुकडे केले, विश्वासघात केल्याचा आरोप पंतप्रधानांनी केला. मोदींच्या या आरोपावर काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनी आपल्या भाषणातून मोदींना जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं.

अशातच आता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनातून पंतप्रधान मोदींवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला आहे. ''वंदे मातरम'ला दीडशे वर्षे झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाने एक ‘उत्सव’ म्हणजे ‘इव्हेंट’ करायचे ठरवले; पण हा खेळ पंतप्रधान मोदी व भाजपच्या अंगलट आल्याचे दिसते. ‘वंदे मातरम’वर लोकसभेत चर्चा सुरू करून चूक केली असे मोदी यांना आता वाटत असेल. ‘वंदे मातरम’ प्रकरणात समस्त विरोधी पक्षाने पंतप्रधान मोदींसह भाजपला वेड्यात काढले.

भाजपच्या तथाकथित राष्ट्रवादाचा मुखवटाच ओरबाडून काढला. मुळात भाजप किंवा त्यांच्या संघ परिवाराचा भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी कोणताच संबंध नाही. या लोकांच्या अंगावर स्वातंत्र्य लढ्यात साधा ओरखडाही उमटला नाही आणि हे ढोंगी राष्ट्रवाद, देशभक्ती, ‘वंदे मातरम’वर देशाला ज्ञान देतात हा विनोद आहे, अशा शब्दात सामनातून मोदींसह भाजप आणि आरएसएसवर टीका करण्यात आली आहे.तर १८९६ मध्ये कोलकाता काँग्रेस अधिवेशनात तरुण रवींद्रनाथ टागोरांनी काँग्रेसच्या मंचावरून प्रथम ‘वंदे मातरम’ गायले तेव्हा लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी यांच्यासह संपूर्ण सभागृह राष्ट्रभक्तीने रोमांचित होऊन उभे राहिले. त्या

▶▶ पान २ वर

## ये खाली बस रे, बंद कर!

### बजरंग सोनवणे थेट केंद्रीय मंत्र्यांना भिडले

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. भाषणादरम्यान त्यांनी वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी सांगताना भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरही निशाणा साधला. ते म्हणाले.



शाळांमध्ये आम्ही वंदे मातरम् म्हणायचो. प्रभात फेऱ्या निघायच्या. हिंदू-मुस्लिम सर्व एकत्रितपणे फिरत होते. ‘विजयी विश्व तिरंगा प्यारा, झंडा ऊंचा रहे हमारा’, हेही आम्ही गात होतो. आज त्याची आठवण येते. सत्तापक्षाच्या

पान २ वर

## लोकांच्या प्रश्नांसाठी भांडणारे अमरनाना नगर पालिकेत पाहिजेच-लोंढे

# लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी अमर नाईकवाडेंना पाठींबा



बीड , (दिव्य न्यूज):- शहरातील प्रभाग क्र.३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार अमर नाईकवाडे यांच्या विजयासाठी प्रभागातील प्रत्येकजण जीव ओतून काम करू लागला आहे. काम करत आलोयं अन् काम करत राहू या भुमिकेतील अमरनानांसाठी सर्व स्तरातून पाठींबा मिळू लागला आहे. अमर नाईकवाडे यांच्या सारख्या लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र रचले जात आहे. मात्र हे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी काँग्रेसचे करण लोंढे यांनी अमर नाईकवाडे यांना पाठींबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. लोकांच्या प्रश्नासाठी भांडणारे अमरनाना नगर पालिकेत पाहिजेच असा निर्धार

▶▶ पान २ वर

## अपघातात तरूणाचा जीव गेला

# १५ दिवसानंतर गुन्हा दाखल,पण चालक,मालकाचे नाव गुप्त का?



आष्टी, (दिव्य न्यूज):- सायंकाळच्या दरम्यान कडा येथील काम आवरून दुचाकीवरून घराकडे येत असताना धामणगांव वरून कड्याकडे जाणाऱ्या ट्रेलरने जोराची धडक दिल्याने तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना २४ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या दरम्यान घडली होती. याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात १५ दिवसांनी म्हणजे ८ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल झाला.पण ट्रेलरचा चालक कोण,त्यात पोकलेन घेऊन जाणारा मालक कोण तसेच मयताची दुचाकी कोणती याचा मात्र पोलिस ठाण्यात

▶▶ पान २ वर

## आठ डब्यांची रेल्वे वडवणी स्थानकात दाखल

# हायस्पीड ट्रायल: ट्रॅक, ब्रिज टेस्टींग करत ३१ किमीचे अंतर कापल

वडवणी , (दिव्य न्यूज):- आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील महत्वाचा बीडपर्यंतचा टप्पा पुर्ण झाल्यानंतर आता रेल्वे परळीच्या दिशेने जाऊ लागली आहे. बीड ते वडवणी या ३१ किमी अंतराच्या हायस्पीड रेल्वे तपासणीला आज सुरूवात झाली आहे.





बीड येथील रेल्वे स्थानकातून वडवणीच्या दिशेने निघालेली रेल्वे आज सकाळी ९ वाजून ४० मिनिटांनी शिवणी स्थानकावर दाखल झाली. तेथून पुढे हायस्पीडचा अंतीम टप्पा असलेल्या वडवणी स्थानकापर्यंत आठ डब्यांसह रेल्वे

▶▶ पान २ वर

# गावातील भ्रष्टाचारावर पुन्हा आवाज काढला, तर संपवून टाकू

## तरुणाला धमकी : सरपंचासह ५ जणांवर गुन्हा दाखल

केज, (दिव्य न्युज):- गावातील विकासकामांवरील तक्रारींची पाहणी सुरू असताना, मध्यस्थी करून भांडण थांबवण्यासाठी गेलेल्या एका माहिती अधिकार कार्यकर्त्यावर सरपंच आणि त्यांच्या साथीदारांनी काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना केज तालुक्यातील सुकळी येथे घडली.

८ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, शाखा अभियंता आणि ग्रामपंचायत अधिकारी हे नाली बांधकामाची पाहणी करत होते. यावेळी सरपंच नितीन गायकवाड हे कचरा कुंडीविषयी बोलत असलेल्या अमोल विनायक गायकवाड यांच्यावर तुझा काही संबंध नाही असे म्हणून धावून गेले आणि त्यांच्या मारहाणीला सुरुवात केली.मारहाण थांबवण्यासाठी उपस्थित माहिती अधिकार कार्यकर्ते अमर मोहनराव गायकवाड पुढे येताच, सरपंचांनी त्यांच्यावरच संताप काढला. लाकडी काठीने मनगटाजवळ मारून त्यांना गंभीर दुखापत केली. सरपंचांचे

▶▶ पान २ वर




# अभिलेखे कक्षाचे प्रमुख एसीबीच्या रडारवर

## सफाई कामगाराकडे जबाबदारी कशी?

बीड,(दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेमध्ये गुंठेवारीची सत्यप्रत देण्यासाठी सफाई कामगार आशिष मस्के याला १ हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने मंगळवारी रंगेहाथ पकडले. या कारवाईत रात्री उशिरा आणखी एक मोठा ट्रिस्ट आला आहे. मस्के याच्यासोबत लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल पाबळे या खासगी व्यक्तीला सहआरोपी करण्यात आले असून, तो सध्या फरार आहे. ▶▶ पान २ वर



### ’काळे’ कारनाम्यांना जबाबदार कोण?

अभिलेखे कक्षात यापूर्वीही पैशांसाठी अनेकदा लोकांची अडवणूक झाल्याचे आरोप आहेत. या विभागात एवढे ’काळे’ कारनामे सुरू असतानाही आणि कामगारासारखा व्यक्ती लाचखोरीतून ’चंद्रा’वर पोहोचलेला असताना, त्याकडे कोणी दुर्लक्ष केले, असा सवाल उपस्थित होत आहे. आता या लाचेच्या कारवाईत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास एसीबीकडून केला जाणार असून, विभागप्रमुखांसह सत्यप्रतवर सह्या करणारे अधिकारीही अडचणीत आले आहेत.

# बाप-लेकाची जोडी फोडायची दिवसा बंद घरे

## स्थानिक गुन्हे शाखेने आवळल्या मुसक्या

बीड, (दिव्य न्युज):- केज आणि धारुर तालुक्यात दिवसा बंद घरांची रेकी करून धाडसी घरफोड्या करणाऱ्या एका आंतरजिल्हा चोरट्याला बीड स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातून येऊन बाप-लेक मिळून या चोऱ्या करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, पोलिसांनी आरोपीकडून २९ ग्रॅम सोने आणि ५ तोळे चांदी हस्तगत केली आहे.

दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी केज तालुक्यातील खाडेवाडी येथील फिर्यादी संभाजी बन्सी खाडे हे बाहेरगावी गेले असताना त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते. तत्पूर्वी, १७ नोव्हेंबर रोजी धारुर तालुक्यातील केज रोडवरील बालाजी सांभराव पिलाजी यांच्या घरीही अशाच प्रकारे दिवसा

▶▶ पान २ वर

# उमर खालिदला अंतरिम जामीन

## उमर खालिदला बहिणीच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी मिळाला जामीन

दिल्ली,(वृत्तसेवा):- दिल्ली न्यायालयानं गुरुवारी (११ डिसेंबर) जेएनयूचा माजी विद्यार्थी उमर खालिद याला अंतरिम जामीन मंजूर केला आहे. मात्र, न्यायालयानं अंतरिम जामिनावर अनेक अटी घातल्या आहेत.हा जामीन त्याच्याविरुद्ध दाखल झालेल्या यूएपीए प्रकरणाशी संबंधित आहे, ज्यामध्ये दिल्ली दंगली भडकवण्याचा कट रचल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

खालिदनं त्याच्या बहिणीच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी अंतरिम जामीन मागितला होता.करकडडूमा न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश समीर बाजपेयी यांनी उमर खालिदला १६ डिसेंबर ते २९ डिसेंबरपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे.जामिनावर बाहेर आल्यावर, उमर खालिद कोणताही साक्षीदार किंवा या प्रकरणाशी संबंधित कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधणार नाही. जामिनाच्या कालावधीत त्याला त्याचा मोबाईल नंबर तपास अधिकाऱ्यांना द्यावा लागेल आणि त्याचा फोन सक्रिय ठेवावा लागेल.

दिल्लीमध्ये २०२० प्रकरणी झालेल्या दंगलीत बेकायदेशीर कृती प्रतिबंध कायद्यानुसार (ण-झ-) दाखल झालेल्या प्रकरणात उमर खालिद आणि इतर आरोपींनी दाखल केलेला जामीन अर्ज उच्च न्यायालयाने नाकारला होता.दिल्लीत २०२० साली





झालेल्या दंगलीच्या कटाशी संबंधित यूएपीए प्रकरणात दाखल झालेल्या जामीन अर्जांवर २ सप्टेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयात निर्णय देण्यात आला. त्यानुसार त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला.या प्रकरणातील युक्तिवाद आधीच पूर्ण झाले होते. जुलैमध्ये या प्रकरणावरचा निकाल न्यायालयाने राखून ठेवला होता, आज त्याचे वाचन करण्यात आले.उमर खालिद, शरजील इमाम, अतर खान, खालिद सैफी, मोहम्मद सलीम खान, शिफा उर रहमान, मीरान हैदर, गुलफिशा फातिमा आणि शादाब अहमद यांना जामीन नाकारण्यात आला आहे.

दिल्ली न्यायालयाच्या दुसऱ्या एका पीठाने तसलीम अहमद यांना देखील जामीन नामंजूर केला आहे.सर्व आरोपींवर बेकायदेशीर कृती अधिनियम म्हणजे यूएपीए अंतर्गत दहशतवादाचा आरोप लावण्यात आला आहे.दिल्ली पोलिसांचा आरोप आहे की या लोकांनी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला (सीएए) विरोध होत असताना फेब्रुवारी २०२० दिल्लीत सांप्रदायिक दंगलीचा कट आखला होता.या प्रकरणात २० जणांवर आरोप दाखल करण्यात आला होता. त्यापैकी १२ जण अद्याप तुरुंगात आहेत. ६ जणांना जामीन मिळाला आहे आणि दोन जणांना फरार घोषित करण्यात आले आहे.आरोपींकडून यासंदर्भात युक्तिवाद करण्यात आला होता की त्यांना कोणत्याही खटल्याशिवाय पाच वर्षे तुरुंगात ठेवण्यात आलं आहे आणि आतापर्यंत सुनावणी सुरू झालेली नाही.

आरोपींचं म्हणणं होतं की या खटल्याला अजून वेळ लागेल, त्यामुळे त्यांना जामीन देण्यात यावा.त्यांनी असंही म्हटलं होतं की देवांगना कलिता आणि नताशा नरवाल यांना या प्रकरणात जामीन मिळाला आहे. त्यामुळे समानतेच्या आधारे उर्वरित आरोपींना देखील जामीन मिळायला हवा.शरजील इमाम आणि खालिद सैफी सारख्या काही आरोपींच्या याचिका २०२२ पासून दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. उमर खालिदसह अनेक आरोपींच्या याचिका २०२४ पासून प्रलंबित आहेत.युक्तिवादात त्यांनी दोन तर्कांवर भर दिला. पहिला, फेब्रुवारी २०२० चा सांप्रदायिक हिंसाचार एक सुनियोजित कट होता. त्याचा उद्देश भारताच्या सार्वभौमत्वाला हानी पोहोचवण्याचा होता.तर दुसरा तर्क होता, खटल्याला उशीर होत असल्यास जामीन देता येतो. मात्र ज्या खटल्यात दिल्लीत हिंसाचार घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल, त्यामध्ये देता येणार नाही.यातीलच एका प्रकरणाचा तपास दिल्ली पोलिसांचं स्पेशल सेल करतं आहे. हे दिल्लीतील दंगलींच्या कटाशी संबंधित प्रकरण आहे.

पोलिसांचा आरोप आहे की डिसेंबर २०१९ मध्ये सीएएच्या विरोधात निदर्शनं सुरू झाल्यानंतर काही कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांनी दंगल घडवण्याचा कट आखला.या कटाच्या प्रकरणात २० जणांना आरोपी करण्यात आलं आहे. यातील सहा जणांना जामीन मिळाला आहे. १२ जण अजूनही तुरुंगात आहेत तर २ जणांना फरार घोषित करण्यात आलं आहे.कनिष्ठ न्यायालयानं आरोपींची जामिनाची याचिका फेटाळली होती. त्याआधी उमर खालिदची आणखी एका जामीन याचिकादेखील दिल्ली उच्च न्यायालयनं फेटाळली होती.पोलिसांनी या प्रकरणात ५८ साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत. या साक्षीदारांचं म्हणणं आहे की आरोपींनी दंगलीचा कट आखला होता. सध्या या साक्षीदारांची ओळख गुप्त ठेवण्यात आली आहे.

### पोलिसांचा युक्तिवाद

न्यायालयातील सुनावणीत पोलिसांनी सांगितलं की ही दंगल चार टप्प्यात झाली. याची सुरुवात सीएएच्या विरोधातील निदर्शनांनी झाली होती.पोलिसांचं असंही म्हणणं होतं की यादरम्यान शरजील इमाम आणि उमर खालिद यांनी सांप्रदायिक व्हॉट्सअॅपग्रुप बनवले आणि विद्यार्थ्यांना चिथावण्याचा प्रयत्न केला.पोलिसांनी असाही आरोप केला आहे की दोघांनी लोकांची हत्या करण्याच्या उद्देशानं रस्ता अडवण्याचा कट आखला होता.

पान ४ वरून

## जिल्हा परिषद पंचायत समिती

जागेवर चांगली आणि ताकतीची उमेदवार असुन कॉंग्रेस तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समितीच्या जागा स्वबळावर लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले असुन त्याच अनुषंगाने रविवार दिनांक १४ रोजी दुपारी ०१ वाजता तालुका कॉंग्रेस कार्यालय, बीड याठिकाणी बैठक बोलावली असुन भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवार, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

## सोयाबीन व वाहने

चोरीतील सोयाबीन अनिस पठाण वैतागवाडी, सेलू यास विकल्याची देखील माहिती दिली. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांची उकल झाली आहे. पोलीस ठाणेनिहाय जप्त मुद्देमाल- बोरी पोलीस ठाणे हद्दीत दाखल गुन्ह्यातील ७० हजार रुपयांचा मुद्देमाल, सेलू पोलीस ठाण्यात दाखल तीन गुन्हे, पालम पोलीस ठाण्यात दाखल सोयाबीन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच ०३ सीव्ही ८१४९, पूर्णा पोलीस ठाण्यात दाखल सोयाबीन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच २० सीटी ८८०२, परतुर पोलीस ठाण्यात दाखल वाहन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच २० सीटी ८८०२ टाटा एस, आणि मंठा पोलीस ठाण्यात दाखल वाहन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच ०३ सीव्ही ८८४९ अशोक लेलँड अशा एकूण आठ गुन्ह्यांची उकल झाली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती, सहायक पोलीस उपनिरीक्षक मधुकर साठे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव केंद्रे, पोलीस अंमलदार भुजबळ, तूपसुंदर, बुधवंत, चव्हाण, ढवळे, हनवते यांच्या पथकाने मिळून केली.

## 'जिजाऊ माँसाहेब

शासन योजनांमधील कमतरता- या प्रत्येक मुद्द्यावर त्यांनी धडाडीने आवाज उठवला.

त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये प्रशासनाला तातडीची कार्यवाही करावी लागली.उपेक्षितांच्या वेदनांना आवाज देणारी त्यांची निर्भीड लेखनशैली आजही जिल्ह्यातील माध्यमांसाठी आदर्श ठरते.निवड समितीने आपल्या निवेदनात नमूद केले आहे.अण्णासाहेब साबळे यांचे दिव्यांग कल्याण क्षेत्रातील कार्य हे केवळ पत्रकारिता नसून सामाजिक न्यायासाठीचा एक अखंड लढा आहे. त्यांची निर्भीडता, वस्तुनिष्ठता आणि सामाजिक कर्तव्यनिष्ठा यामुळेच त्यांची निवड निश्चित झाली. एक शांत, मनमिळावू पण संकटाच्या क्षणी तितकाच ठाम व आक्रमक पत्रकार म्हणून त्यांनी जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भीती, दबाव किंवा राजकीय हस्तक्षेपाला न जुमानता दिव्यांगांच्या हक्कांसाठी लढणे- ही त्यांची कार्यशैली नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या पुरस्कारामुळे आष्टी तालुक्यातील दिव्यांग कल्याण क्षेत्राला एक नवीन दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. सामाजिक संस्था, पत्रकार संघटना, मान्यवर, ग्रामस्थ आणि दिव्यांग बांधवांनी अण्णासाहेब साबळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.हा पुरस्कार लवकरच भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजन समितीने दिली आहे.

## संस्थेची गाडी कार्यालयासमोर

यादीमध्ये आपला अर्ज दाखल केल्याची माहिती आमच्या खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.

आज सायंकाळी भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात केशव उपाध्ये यांची पत्रकार परिषद होती. ही पत्रकार परिषद झाल्यानंतर भाजपच्या शहर कार्यालय बाहेर तानाजी सावंत यांच्या जे.एस.पी.एम संस्थेची एक कार अचानक आली आणि त्यामध्ये सावंत यांच्या संस्थेतीलच काही कर्मचारी होते आणि त्यांच्या हातात होता तो तानाजी सावंत यांचे पुत्र गिरीराज सावंत यांचा उमेदवारी अर्ज. काही वेळातच या कर्मचाऱ्यांनी गिरीराज सावंत यांचा उमेदवारी अर्ज भाजपच्या कार्यालयात दाखल केला आणि ते तिथून निघून गेले.

याबाबत आमचे प्रतिनिधी यांनी गिरीराज सावंत यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी 'शिवसेना हा आमचा पक्ष आहे. आमच्या घरात आमदार आहेत त्यामुळे भारतीय जनता पक्षाची उमेदवारी स्विकारण्याचा किंवा घेण्याचा संबंध येत नसल्याचं' म्हटलं आहे. दरम्यान, जरी गिरीराज सावंत यांनी या चर्चेमध्ये तथ्य नसल्याचं म्हटलं असलं तरी खात्रीलायक सूत्रांनुसार पुण्यातील प्रभाग क्रमांक ३८ मधून गिरीराज सावंत यांनी अर्ज भरला आहे. आता गिरीराज सावंत यांनी खरंच भाजकडून अर्ज भरला आहे की नाही? हे पाहणं तेवढंच महत्त्वाचं आहे.दरम्यान, आगामी पुणे महापालिका निवडणूक भाजप स्वबळावर लढेल हे जवळपास निश्चित मानलं जात आहे. त्या दृष्टिकोनातून भाजपने संपूर्ण १६५ जागांची तयारी केली असून सर्व प्रभागातून इच्छुकांचे अर्ज मागवले आहेत. यासाठी दोन दिवसांची मुदत देण्यात आली होती. या दोन दिवसांच्या मुदतीमध्ये तब्बल २२०० अर्ज इच्छुक घेऊन गेले आहेत. प्रभागवार विचार केला तर प्रत्येक प्रभागामध्ये २० हून अधिक जण भाजपकडून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असल्याचं पाहायला मिळत आहे. आता आधीच भाजपमध्ये इच्छुकांची कमी नसताना दुसऱ्या पक्षातील इच्छुकांनी उमेदवारी अर्ज घेऊन गेल्यानंतर भाजपच्या निष्ठवंतांची डोकेदुखी मात्र वाढली आहे हे नक्की.

पान १ वरून

## 'वंदे मातरम'चा '

क्षणापासून हे गीत राष्ट्राचा आत्मा बनले. अर्थात विडंबना अशी की, ज्या कॉंग्रेसने 'वंदे मातरम्'ला मंच दिला, प्रतिष्ठा दिली त्याच कॉंग्रेसकडून नव्या जमान्यातील राष्ट्रभक्तीचे ठेकेदार राष्ट्रभक्तीचे प्रमाणपत्र मागत आहेत, असा टोला पंतप्रधान मोदींना सामनातून लगावला आहे.

तर भाजपचे पूर्वज स्वातंत्र्य लढ्यात नव्हते. ते इंग्रज आणि मोहम्मद अली जीनांबरोबर होते. द्विराष्ट्रवादाचे समर्थन करीत होते व आता सत्तेवर बसून राष्ट्रभक्तीवर ज्ञान पाजळत आहेत. भाजपला व संघ परिवारास अचानक 'वंदे मातरम्'वर प्रेम उफाळून आले. हा बंगाल निवडणुकीसाठी चाललेला खेळ आहे. संघ परिवाराने देशाला सांगायला हवे की, त्यांच्या शाखांमध्ये सर्वप्रथम 'वंदे मातरम' कधी गायले होते? संघाने तेसुद्धा स्पष्ट केले पाहिजे की, त्यांना 'वंदे मातरम्'बाबत इतके प्रेम होते तर आपल्या शाखांत 'वंदे मातरम्'ऐवजी 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमी'चा स्वीकार का केला? असा सवालही सामनात उपस्थित केले आहेत. तर 'वंदे मातरम्'वरील चर्चेत पंतप्रधान मोदी नेहमीप्रमाणे नेहरूंवर घसरले. प्रे. ट्रम्प, पुतीन यांच्याबरोबर कितीही मेजवान्या झोडल्या व त्यांना मिठ्या मारल्या तरी पंडित नेहरूंना जागतिक नेते म्हणून मिळालेला मान, प्रतिष्ठा मोदींच्या वाट्याला येऊ शकत नाही.

निवडणुकीत घोटाळे करून, पैशांचा वापर करून निवडून येणाऱ्या सरकारचे पंतप्रधान हीच त्यांची जागतिक ओळख आहे, असा जोरदार हल्लबोल देखील ठाकरेंकडून करण्यात आला आहे. तर 'वंदे मातरम्'वरील चर्चेत प्रियंका गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांची भंबेरी उडवली. सत्ताधारी खासदारांची वाचाच गेली. प्रियंका म्हणाल्या, ''जितकी वर्षे मोदी देशाचे पंतप्रधान आहेत, तितकी वर्षे जवाहरलाल नेहरू देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात तुरुंगात राहिले.''नेहरू १७ वर्षे प्रधानमंत्री राहिले व त्यांनी देश घडवण्याचे काम केले. शिवाय विविध संस्थांची स्थापना करत नेहरूंनी या देशासाठी, देशाची सेवा करीत शेवटचा श्वास घेतला, असं प्रियंका गांधी म्हणाल्या. त्यानंतर प्रियंका गांधींनी थेट मोदींना आव्हान दिलं, त्या म्हणाल्या, मोदीजी, नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधींना काय बोलायचंय, दोष द्यायचेत ते एकदाचे देऊन टाका. त्यासाठी हवे तेवढे तास चर्चा ठेवा; पण त्यानंतर मात्र ते थांबवा आणि बेरोजगारी, महागाई, महिलांच्या समस्या यावर पण चर्चा करू या.''

देशात असंख्य प्रश्न थैमान घालीत असताना पंतप्रधान मोदी व त्यांचे अंधभक्त 'वंदे मातरम्'वर वाद उकरून काढतात. देशाची हवाई नागरी सेवा उद्ध्वस्त झाली आहे. अनेक म्हातारे, आजारी लोक विमानतळावर अडकून पडले आहेत. लोकांची लूट चालली आहे आणि मोदी संसदेत वंदे मातरमचे वाद आणि चर्चा करण्यात व्यस्त आहेत. प. बंगालच्या निवडणुका जिंकता याव्यात म्हणून पाच वर्षांपूर्वी मोदी यांनी दाढी वाढवून रवींद्रनाथ टागोरांचे रूप धारण केले होते. मात्र त्याचा काहीच परिणाम झाला नाही.आता त्यांनी प. बंगाल निवडणुकीसाठी 'वंदे मातरम्' आणि बंकिमचंद्र यांना वेठीस धरले, पण त्यात मोदी यांचीच फजिती झाली. प्रियंका गांधी यांनी तर हसत हसत मोदींच्या जखमेवर मीठ चोळले. राष्ट्रभक्तीचा बाजार आणि व्यापार करणे हाच पंतप्रधान मोदी व त्यांच्या लोकांचा खेळ आहे. 'वंदे मातरम्' पवित्र असल्याने या प्रकरणात ते फसले आहेत. 'वंदे मातरम्'चा गजर करीत भगतसिंगांपासून अशफाकउल्ला खानपर्यंत असंख्य क्रांतिवीर फासावर गेले. त्यात मोदी पक्षाचा एकही पूर्वज नव्हता. त्यांनी 'वंदे मातरम्'वर ज्ञान पाजळावे हा अतिरेकच आहे, असं म्हणत सामनातून मोदींसह भाजप संघावर ताशेरे ओढले आहेत.

## ये खाली बस रे,

पितृ संघटनेने तो तिरंगा कधीही ५० वर्षात आपल्या कार्यालयावर फडकवला नाही, कधी राष्ट्रगीतही म्हटले नाही. आज तेच लोक वंदे मातरम् चे कौतुक करत आहेत, असे अरविंद सावंत म्हणतात विरोधी बाकांवर शेम-शेम असा आवाज आला.

सत्ताधारी बाकांवरून मात्र त्याचा विरोध झाला. सावंत यांचे भाषण ऐकणारे केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी त्यांच्यावर चांगलेच भडकले. त्याचवेळी सावंत यांच्या शेजारी बसलेले राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे धावून आले. 'ये खाली बस रे, बंद कर' असे म्हणू लागले. त्यांच्यामागे बसलेले सावंत यांच्या पक्षाचे खासदार संजय दिना पाटील यांनीही हातवारे करून खाली बसण्याचा इशारा केला.प्रल्हाद जोशी यांनी सावंत यांच्या विधानावर संताप व्यक्त करत म्हटले की, खासगी इमारतींवर तिरंगा फडकावला जात नाही, एवढेही त्यांना माहिती नाही. बाळासाहेब ठाकरेंनी जर अरविंद सावंत यांना ऐकले असते, त्यांच्या आत्म्याला खूप दु:ख झाले असते, हे त्यांना समजायला हवे, असा टिप्पणीही जोशी यांनी केली. त्यावर सावंत यांनी मी सत्य सांगत असल्याचे नमूद केले.सावंत एवढ्यावरच थांबले नाहीत. हेडगेवार आणि गोळवलकर गुरूजी यांच्या एकाही पुस्तकात वंदे मातरमचा उल्लेख नसल्याचे त्यांनी सांगितले. आजही राज्यसभेत एक नियम आहे. जयहिंद, वंदे मातरम् म्हणायचे नाही. आम्ही राज्यसभेच्या सभापतींना भेटलो होतो, त्यांनी तो नियम रद्द केलेला नाही, असे सावंत यांनी सांगितले.

## लढाऊ नेतृत्वाला

व्यक्त करत प्रभागातील मतदारांनी आपल्या हक्काच्या माणसाला साथ देण्याची हीच वेळ असून सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन करण लोंढे यांनी केले आहे.

बीड येथील प्रभाग क्र.३ मधील कॉंग्रेसचे करण लोंढे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार अमर नाईकवाडे यांना जाहीर पाठींबा दिला आहे. या संदर्भात करण लोंढे यांनी म्हटले आहे की, आज मी माझ्या सर्व सहकार्यांनी विचारात घेऊन अमर नाईकवाडेंना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रभाग क्र.३ मधील आजची राजकीय परिस्थिती पाहता कुठेतरी एका सर्व सामान्य कुटूंबातून पुढे आलेल्या लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे वाटू लागले आहे. ज्या नेतृत्वाच्या माध्यमातून आपल्या प्रभागाचा प्रबळ विकास झालेला आहे. ज्याने घराणेशाही आणि झुंडशाहीला तोंड देत नगर पालिकेच्या सभागृहात प्रभागातील विकास कामांसाठी आवाज उठवलेला आहे, भांडूण विकास कामे आणलेली आहेत. स्वत:च्या जिवाची पर्वा न करता निर्भिडपणे आपल्या प्रभागाच्या प्रश्नासाठी आणि येथील नागरीकांसाठी लढणार्या अमर नाईकवाडे यांना साथ देण्याची हीच वेळ आहे. त्यामुळे सर्व मतदार बंधु-भगिनी आणि मातांनी आपलं एक मौल्यवान मत घड्याळीला म्हणजेच अमर नानांना देऊन त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन करण लोंढे यांनी केले आहे. दरम्यान करण लोंढे यांच्या पाठींब्याने कॉंग्रेसचे मजुबत हात अमरनानांच्या पाठीशी असल्याचे स्पष्ट झाले आहे. सर्व सामान्य जनतेनेही अमरनाना यांनाच पसंती देण्याचा निर्णय घेत अमर नानांसारख्या लढाऊ नेतृत्वाला बहुमताने नगर पालिकेच्या सभागृहात पाठवण्याचा निर्धार केला आहे.

## हायस्पीड ट्रायल:

धावली. सकाळच्या टप्यात ४० ते ४५ च्या स्पीडने निघालेली रेल्वे बीड ते वडवणी मार्गावरील ट्रॅक, ब्रिज याची तपासणी करत वडवणी रेल्वे स्थानकात दाखल झाली. सुरक्षिततेच्या अनुषंगाने ट्रॅक आणि ब्रिजची टेस्टींग करण्यात आली असुन बीड ते वडवणी हे ३१ किमीचे अंतर पार करत अखेर रेल्वे वडवणीपर्यंत धावली आहे. दुपारनंतर ही रेल्वे हायस्पीड होणार असल्याने अनेक तपासण्या या दरम्यान करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## १५ दिवसानंतर गुन्हा

नोंद का नाही हा संशोधनचा विषय आहे.

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील तरूण शेतकरी संदिप विशनाथ अनारसे हे २४ नोव्हेंबर रोजी दुचाकी क्रमांक एम.एच या दुचाकीवर कडा येथे गेले होते.काम आवरून रात्री साडेसात पावणे आठच्या दरम्यान देवीनिमगाव कडे येत असताना धामणगांव वरून कड्याकडे पोकलेन घेऊन जाणारा ट्रेलर क्रमांक एम.एच ४६,एच.१६९५ च्या चालकाने हायगयीने ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवल्याने दुचाकीला जोराची धडक दिल्याने यात संदिप अनारसे याचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.पोलिस ठाण्यात ८ डिसेंबर रोजी म्हणजे १५ दिवसानंतर अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला.पण मालक कोण हे देखील माहित होणे आवश्यक आहे.तसेच मयताच्या दुचाकीचा नंबर सोशल मीडियावर अपघात झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.त्याचाही शोध घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी आता विशनाथ भगवान अनारसे याच्या फिर्यादीवरून ट्रेलर व अज्ञात चालकाविरुद्ध वाहन हायगयीने व निषाकाळजीपणे चालविल्या प्रकरणी सोमवारी कलम १०६(१)२८१,१२५,(बी)भारतीय न्याय संहिता २०२३ सह १४३,१८४ मोवाका नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके करीत आहेत.

## गावातील भ्रष्टाचारावर

साथीदार अक्षय बालासाहेब गायकवाड यांनी अमर गायकवाड यांच्या डाव्या डोळ्याजवळ काठीने प्रहार केला. प्रदीप भिसे यांनी त्यांच्या खांद्यावर व पाठीवर काठीने मारहाण केली, तर अनिकेत गायकवाड, ज्ञानेश्वर गव्हाणे आणि रविराज खाडे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. त्याचबरोबर, गावातील भ्रष्टाचाराबद्दल पुन्हा आवाज उठवला, तर जीवाने संपवू अशी धमकीही दिल्याचे सांगितले जाते.

जखमी अमर गायकवाड यांच्यावर अंबाजोगाई येथील श्री स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या तक्रारीवरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात सरपंच नितीन साहेबराव गायकवाड आणि इतर पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भारत बरडे करत आहेत.

## बाप-लेकाची

घरफोडी झाली होती. या दोन्ही घटनांची गंभीर दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करत होते. दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, हे गुन्हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वाळुंज पारगाव येथील अक्षय काळे आणि त्याचे वडील अस्तांदुर काळे यांनी केल्याचे समजले.

या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ वाळुंज पारगाव येथे सापळा रचला. तेथे संशयित अक्षय अस्तांदुर काळे (वय २२) याला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपले वडील अस्तांदुर काळे याच्या मदतीने केज व धारुर येथे चोऱ्या केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, त्याच्या ताब्यातून घरफोडीतील २९ ग्रॅम सोन्याचे दागिने, ५ तोळे चांदी आणि गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, केजचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, हवालदार महेश जोगदंड, राजू पठाण, भागवत शेलार, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, राजू वंजारे व पथकाने पार पाडली.

## अभिलेखे कक्षाचे

या कारवाईतील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे, सफाई कामगार असलेल्या आशिष मस्के यांच्याकडे कसलेही अधिकृत आदेश नसताना त्याला पालिका अभिलेखे कक्षात कामाची जबाबदारी कशी देण्यात आली? राजकीय व्यक्तींच्या आशीर्वादाने आणि काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण सहकार्यानेच तो या कक्षात कार्यरत होता. त्यामुळे, ज्या विभागप्रमुखाने आदेश नसतानाही कामगाराला ही जबाबदारी दिली, ते आता थेट एसीबीच्या रडारवर आले आहेत.

अविनाश धांडे आत्महत्येचे प्रकरण शांत

याच पालिकेतील वसुली विभागातील कर्मचारी अविनाश धांडे यांनी आत्महत्या केल्यानंतर, मृत्यूपूर्वी त्यांनी आरोप केलेल्या व्यक्तींची अद्यापही पोलिसांनी चौकशी केलेली नाही.या आरोपींना 'लाख'मौलाचे सहकार्य करण्यासाठी काही राजकीय व्यक्ती धावपळ करत असल्याची सूत्रांची माहिती आहे. बीड शहर पोलीस मात्र या प्रकरणावर मौन बाळगून आहेत.

# वडवणी पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी नाही तर कर्मचारीही दांडी यात्रेवर

**वडवणी , (दिव्य न्यूज):- वडवणी गटविकास अधिकारी यांना दोन तालुक्याचा चार्ज आहे त्यामुळे ते आठवड्यातील एक, दोन दिवस वडवणी ऑफिसला असतात परंतु ते नसताना मोजकेच कर्मचारी कार्यालयात उपस्थित असतात बाकी कर्मचारी अनुउपस्थित असतात त्यामुळे कार्यालयामध्ये ई-बायमेट्रिक प्रणाली बसवावी व अशा कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.**







ग्रामीण भागासाठी विकासाचा दुआ असणाऱ्या पंचायत समिती कार्यालयामध्ये गटविकास अधिकारी आठ दिवसातून एक,दोन वेळेस येत असतात परंतु कार्यालयातील बाकी कर्मचारी देखील गटविकास अधिकारी यांच्याप्रमाणे इतर तालुक्याचे चार्ज घेऊन कार्य करत असल्याचे बंद कार्यालयाच्या माध्यमातून आपल्याला पाहायला मिळत आहे. तालुक्यातून नागरिक त्यांची घरकुल जलसिंचन विहीर , गाय गोठा व इतर काही कामानिमित्त तालुक्याला ऑफिसला येत असतात परंतु असे कर्मचारी नसल्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काल देखील कार्यालयात ४.३० वा. कार्यालयात. फक्त २ कर्मचारी उपलब्ध होते. तसेच असंख्य कर्मचारी तर शुक्रवार रोजीच पंचायत समिती कार्यालयातून गायब होतात ते थेट सोमवारीच दिसतात अशी परिस्थिती आहे. त्यामुळे कामासाठी आलेल्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच पंचायत समिती प्रशासनामध्ये कसलेही प्रकारे शिस्त पाहायला मिळत नाहीये पंचायत समिती सारख्या कार्यालयाला दुपारीच कार्यालय बंद करणे किंवा दुपारी उपस्थित नसणे, कार्यालयीन वेळेच्या अगोदर निघून जाणे,हे अत्यंत दुर्दैवाचे बाब आहे अशा काम चुकार कर्मचारी यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे व असा काम चुकारपणा पुन्हा होऊ नये यासाठी कार्यालयामध्ये बायोमेट्रिक लावणी गरजेचे आहे . याकडे मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. बीड,गटविकास अधिकारी यांनी तत्काळ दखल घेऊन कारवाई करावी.नसता शासकीय कामासाठी येणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना आंदोलन करण्याशिवाय पर्याय नाही.

> काल बुधवार रोजी मी व काही ग्रामस्थ पंचायत समिती कार्यालयात कार्यालयीन वेळ असणाऱ्या साडेचार वाजता गेलो त्यावेळी कार्यालयात सर्व विभागाचे दरवाजे लावलेले होते यावेळी त्या ठिकाणी फक्त दोन कर्मचारी उपस्थित असल्याचे आढळून आले आहे त्यामुळे वडवणी पंचायत समितीचा गलथान कारभार पहावयास मिळत आहे तरी अशा कामचुकार अधिकारी,कर्मचाऱ्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी कारवाई करावी तसेच सर्व कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक प्रणाली लागू करावी जर पंचायत समिती अधिकारी कर्मचारी यांचा कारभार सुधारला नाही तर आंदोलन करण्यात येईल
>
> –विनोद काकडे
>
> (वंचित बहुजन आघाडी युवक तालुका अध्यक्ष वडवणी)

# जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने बीड तालुका काँग्रेसची रविवारी बैठक

## काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व निवडणूका ताकतीने लढविणार- गणेश बजगुडे



बीड , (दिव्य न्यूज):- आगामी होवु घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी बीड तालुका काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली असल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिली आहे. मागील अनेक वर्षांपासून काँग्रेस बीडमध्ये निवडणुका लढल्याचे दिसुन येत नाही परंतु यावेळी मात्र तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी स्वबळाचा नारा देत बीड नगर पालिका निवडणुक मोठ्या ताकतीने लढवत शहरात सर्वत्र डोअर टू डोअर प्रचार करत बजगुडे पाटील यांनी बीड शहर पिंजून काढले त्याच पद्धतीने आता येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकामध्ये आमच्याकडे सर्व

▶▶ पान २ वर

## डोंगरकिन्ही मतदारांचे लक्ष वेधणारी उमेदवारी

# पांडुरंग नागरगोजे पुन्हा विकासाच्या रिंगणात



पाटोदा, (दिव्य न्यूज):- पाटोदा तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रामीण विकास क्षेत्रात सातत्याने काम करणारे पांडुरंग नागरगोजे यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याची अधिकृत घोषणा केली आहे. प्रशासकीय अनुभव, ग्रामविकासातील नेतृत्व आणि जनसंपर्काची भक्कम ताकद याच्या जोरावर त्यांची उमेदवारी डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटात उत्सुकता निर्माण करत आहे.

केंद्रीय राखीव पोलीस दलातील सेवेनंतर १९९७ मध्ये ग्रामपंचायत राजकारणात प्रवेश केलेल्या नागरगोजे यांनी २००७ मध्ये उपसरपंच म्हणून गावात अनेक विकासात्मक निर्णय अंमलात आणले. २०१४ ते २०१९ दरम्यान रोजगार हमी योजनेच्या तालुका समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी ५९ ग्रामपंचायतींमध्ये विहिरी, शेततळी, वस्ती रस्ते व जलसंधारणाच्या मोठ्या कामांना गती देऊन दुष्काळी परिस्थितीत महत्त्वाचा दिलासा दिला. संजय गांधी निराधार योजना कोणताही गैरप्रकार न होता पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, आदर्श छावणीमुळे जनावरांचे प्राण वाचवणे, तंटामुक्त गाव, खडज ९००१ अंगणवाडी, स्मार्ट शाळा, महिला सक्षमीकरण, वीज लोड एक्स्टेंशन, जल व्यवस्थापन अशा विविध उपक्रमांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.गावकऱ्यांच्या विश्वासाने पहिले लोकनियुक्त सरपंच बनण्यापासून ते अखिल भारतीय सरपंच परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष म्हणून राज्यभरातून गौरव मिळवण्यापर्यंत त्यांचा प्रवास प्रशंसनीय राहिला आहे. कोविड काळात त्यांनी अनेक गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मदतकार्य केले.कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती म्हणून काम करताना बंद पडलेल्या मंडईला 'ड' मधून 'क' दर्जा मिळवून देणे, व्यापारी गाळ्यांची उभारणी व पायाभूत सुविधा विकसित करणे आणि समितीला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेणे ही त्यांच्या कार्यकाळातील ठळक वैशिष्ट्ये आहेत.शेतकरी, उपेक्षित घटक आणि सर्वसामान्यांसाठी २४ तास उपलब्ध राहणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत पांडुरंग नागरगोजे यांनी पुढे यावे, अशी मागणी डोंगरकिन्ही सर्कलसह तालुकाभरातून जोर धरत आहे.



नेकनूर : नेकनूरचे उपसरपंच सचिन शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय वतीने यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या उपस्थित नेकनूरच्या सरपंच सुंदर लांडगे, ग्रामसेवक नागरे साहेब, ग्रामपंचायत मेंबर, मुकुंद काळे, जय निर्मळ, रिजवान सय्यद, जितेंद्र होमकर, शेख सजेद आली, विजू भाई, शिवा दादा शिंदे, जयदीप काळे, विलास राऊत, रायचंद कापसे, केतन रोकडे,नेकनूर दिव्य वार्ताचे प्रतिनिधी शेख शाकेर सह आदी उपस्थित होते.

# सोयाबीन व वाहने चोरणारा सराईत गुन्हेगार पोलीसांच्या ताब्यात

## स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई



परभणी, (दिव्य न्यूज):- जिल्ह्यातील विविध तालुक्यात आणि मोठ्या गावात सोयाबीन आणि वाहन चोरी तसेच इतर मालमत्ता प्रकरणातील गुन्हेगाराला परभणी पोलिसांच्या स्थानिक गुन्हा शाखेने कारवाई करत बुधवारी(दि. १०) जेरबंद केले.

जिल्हाभरात विविध पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या सोयाबीन आणि वाहन चोरी प्रकरणातील आरोपीला शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला मार्गदर्शक सूचना देऊन रवाना केले. हे पथक गस्त घालीत असताना गुप्त माहिती मिळाली की, बोरी पोलीस ठाणे हद्दीत सोयाबीन चोरी प्रकरणातील मुख्य आरोपी ज्ञानेश्वर शंकर पवार (वय २६)रा

राजीव गांधीनगर, सेलू हा सेलू शहरात आहे. या माहितीच्या आधारे सेलू पोलिसांच्या पथकाने आरोपी ज्ञानेश्वर पवार यास अष्टविनायक मंदिर परिसरातून शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेत असताना आरोपीने पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यास पुन्हा ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने बोरी पोलीस ठाणे हद्दीतील सोयाबीन चोरीसह अनेक ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्याच्यासोबत सागर सुंदर काळे(वय १९ ) आणि गणेश राजू कळे रा. दोघे राजीव गांधीनगर, सेलू हे साथीदार असल्याचेही उघड झाले. आरोपीच्या कबुलीनुसार त्याच्या घरातून सोयाबीनचे तब्बल ४ कट्टे सोयाबीन ज्याची अंदाजे किंमत सत्तर हजार रुपये आहे. असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपी ज्ञानेश्वर पवार याने सेलू, पालम, पूर्णा, परतुर, मंठा येथेही सोयाबीन चोरी तसेच सेलू येथे शेतीपंप मोटार चोरी, परतूर आणि मंठा येथे वाहन चोरी केल्याची कबुली दिली.

▶▶ पान २ वर

## दिव्यांगांच्या हक्कासाठी लढणारा निर्भीड आवाज-पत्रकार अण्णासाहेब साबळे

# 'जिजाऊ माँसाहेब आदर्श दिव्यांग पत्रकार पुरस्कारसाठी घोषित!



दौलावडगाव , (दिव्य न्यूज):- दिव्यांग बांधवांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी गेली अनेक वर्षे अविरत लढा देणारे, माळी गल्ली, आष्टी (जि. बीड) येथील प्रखर सामाजिक बांधिलकी असलेले पत्रकार अण्णासाहेब दिनकर साबळे यांची प्रतिष्ठेच्या 'जिजाऊ माँसाहेब आदर्श दिव्यांग पत्रकार पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आल्याची घोषणा मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी तर्फे करण्यात आली.

या निवडीची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी दिली.तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेतर्फे यावर्षी प्रथमच राज्यस्तरावर विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय व लोकहितवादी कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. त्यामध्ये दिव्यांग कल्याण व सामाजिक पत्रकारितेतील विशेष योगदानाबद्दल अण्णासाहेब साबळे यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे.दिव्यांग सुविधा केंद्रातील त्रुटी, मेडिकल प्रमाणपत्रासाठी होणारी हालअपेष्टा, बसस्थानकांवरील गैरवर्तन, प्रवासातील अडथळे, शिक्षणातील समस्या, तसेच

▶▶ पान २ वर

# संस्थेची गाडी कार्यालयासमोर लागली, सहकाऱ्यांच्या हातात उमेदवारी अर्ज, तानाजी सावंत यांच्या मुलाला हवी भाजपची उमेदवारी?




पुणे , (दिव्य न्युज):- पुणे शहरात महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज मागितले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात जवळपास २२०० हून अधिक इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची माहिती आहे. यामध्ये अनेक विरोधी पक्षातील इच्छुक उमेदवारांनी सुद्धा भाजपचा अर्ज भरल्याची माहिती आहे. यामध्ये एक धक्कादायक नाव समोर आलं आहे, ते म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुत्र गिरीराज सावंत यांनी देखील भाजपच्या इच्छुकांच्या

▶▶ पान २ वर